पर्यावरण संरक्षण व व संवर्धन ही सामाजिक जबाबदारी असून तसेच ती व्यक्तिगत जबाबदारी- मा. श्री. अमोल कुलकर्णी

"पर्यावरण संरक्षण व व संवर्धन ही सामाजिक जबाबदारी असून तसेच ती व्यक्तिगत जबाबदारी देखील आहे याची जाणीव ठेवून पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत असणारे घटक कमी केले पाहिजेत व ध्वनिप्रदुषण, जलप्रदुषण, वायूप्रदुषण, भूप्रदुषण यांची कारणे, स्त्रोत व परिणाम इत्यादींचा विश्लेषणात्मक अभ्यास करून प्रतिबंधात्मक उपाय सुचविले गेले पाहिजेत, असे उद्गार श्री व्यंकटेश महाविदयालय इचलकरंजी येथे 'ध्वनिप्रदुषण व पर्यावरणाचा ऱ्हास' या विषयावर बोलताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. अमोल कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या वेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. व्ही. ए. माने. उपस्थित होते. ध्वनी प्रदूषणाचा मानवी जीवनावर होणारा दुष्परिणाम याविषयी त्यांनी ही माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ.एस. एन. जरंडीकर यांन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मोहिनी ओचलिया यांनी केले. तर आभारप्रदर्शन 'प्रा. एस. एस. कदम यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला कार्यक्रमासाठी विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक व प्राध्यापके तर वर्ग उपस्थित होता.

